PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 2, ISSUE 2

# 'अश्रूंची झाली फुले': वाङ्मयीनदृष्ट्या मूल्यमापन

**प्रा. डॉ. सविता माधवराव पवार**
श्रीमती सिंधुताई जाधव कला व
विज्ञान महाविद्यालय, मेहकर,
जि. बुलढाणा महाराष्ट्र भारत

## प्रस्तावना :

'अश्रूंची झाली फुले' हे वसंत कानेटकर यांचे आठवे नाटक. हे एक विचारनाट्य आहे. मानवी जीवनातील श्रध्देला जे विस्कळीत स्वरुप येत आहे त्याचे चित्र वाचकांसमोर उभे करण्याचा प्रयत्न प्रस्तुत नाटकातून झाला आहे. या नाटकापूर्वी आपली प्रतिभा नाट्यातून वहरुन नाट्यसंसाराची सप्तपदी वसंत कानेटकरांनी पूर्ण केली होती. या नाटकात सत् आणि असत् प्रवृत्तीमधला संघर्ष रंगविला आहे. कानेटकरांनी 'प्रेमा तुझा रंग कसा' आणि 'रायगडाला जेंव्हा जाग येते' ही परस्परांहून वेगळी वाटावी अशी दोन नाटके सुरुवातीच्या काळात लिहिली व ती दोन्ही सारखीच लोकप्रिय झाली. तेव्हापासून कानेटकरांनी आपल्या प्रेक्षकांची नाडी ओळखली आणि या प्रेक्षकाला काय आवडते याचा अंदाज घेताच काही आकर्षक युक्त्या प्रयुक्त्यांचा वापर ते पुढील नाटकात करीत गेले. 'अश्रूंची झाली फुले' हे त्यांचे नाटक अतिशय लोकप्रिय झाले. त्याच्या लोकप्रियतेची कारणमीमांसा आणि एकंदरीत प्रस्तुत नाटकाचे वाङ्मयीनदृष्ट्या मूल्यमापन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.

## नाट्यतंत्राचा प्रभावी वापर :

'अश्रूंची झाली फुले' हे कानेटकरांचे शतकमहोत्सवी प्रयोग झालेले नाटक आहे. इतके लोकप्रिय झालेले नाटक तांत्रिकदृष्ट्या प्रभावीच असले पाहिजे. प्रस्तुत नाटक इतके लोकप्रिय झाले व ते यशस्वी झाले यावरुन या नाटकास प्रायोगिक मूल्य बरेच आहे हे सहज मान्य होण्यासारखे आहे. लोकसमुदायाला खूष करण्याचे तंत्र कानेटकरांना चांगले अवगत झाले आहे, असे म्हणता येत. वास्तविक समकालीन परिस्थितीला सत व असत प्रवृत्तीच्या चिरंतन लढ्याचे स्वरुप देऊन त्यांनी नाटकातील संघर्ष उच्च पातळीवर नेला आहे. मराठी मनाची नाडी ओळखून काही ह्रदय कौटुंबिक प्रसंग रंगविले आहेत. कोसळत्या क्षणी नायकाला सावरून धरणाऱ्या धीरोदात्त सात्विक स्त्रीचे प्रेक्षकांना आवडणारे विलोभनीय दर्शन घडविले आहे. ह्या नाटकाच्या जमेच्या बाजू आहेतच. याशिवाय नाट्यक्षेत्रात नवे प्रयोग करणाऱ्या अभिजात लेखकांपैकी कानेटकर आहेत हे त्यांनी या नाटकातही दाखवून दिले आहे.

अश्रूंची झाली फुले हे एक विचारप्रवर्तक नाटक आहे. प्रयोगशील नाटककार यादृष्टीने लेखकाने कथावस्तूच्या संदर्भात नाविन्याचा स्वीकार केलेला दिसतो. तथापि व्यक्तिदर्शनाच्या दृष्टीने मात्र नायक–नायिका म्हणजे सद्‌गुणाचे पुतळे तर खलनायक हा मात्र दृष्ट दुर्जन अशा स्वरुपाचे रंगवून जुन्याच रूढीचा अंगिकार केलेला आहे. व्यक्ति विरुध्द परिस्थिती असा संघर्ष व्यवस्थित चित्रित केलेला


VOL 2, ISSUE 2 www.puneresearch.com/times APR-JUNE
(IMPACT FACTOR 2.07) INDEXED, PEER-REVIEWED / REFEREED INTERNATIONAL

आहे. पण व्यक्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न हा कमी पडलेला दिसतो. विद्यानंदाच्या मनातील विचारांची व भावनांची आंदोलने सुंदर रीतीने दर्शवित असूनही त्याच्यातील व्यक्तित्वाचा शोध लेखकाने पूर्ण घेतला नाही हे स्पष्ट दिसते. ट्रॅजेडी–कॉमेडी ही परिभाषा आजच्या संदर्भात अतिशय ढोबळ स्वरुपाचे वर्गीकरण करणारी व म्हणून जवळजवळ त्याज्य ठरली आहे. उलट डार्क–कॉमेडीसारखे विरोधाभास दाखविणारे शब्द नाटकाच्या वर्गीकरणाच्या दृष्टीने समर्पक वाटू लागले आहेत. मानवी जीवन, मानवी स्वभाव हा अत्यंत संदिग्ध व गूढ आहे याची जाण कलावंतांना व रसिकांनाही आली आहे. म्हणूनच कॉमेडी किंवा ट्रॅजेडीच्या साच्यात जीवनातील अनुभव बसविणे अशक्य होत जाऊन डार्क कॉमेडीसारखे नाट्यप्रकार पुढे येत आहेत.

प्रस्तुत नाटकाचा पडदा पडतो परंतु प्रेक्षकांच्या मनातील नाटक संपत नाही. डार्क कॉमेडीचे आणखी हे एक वैशिष्ट्य या नाटकात आहे आणि ते म्हणजे निर्णय न देणे, अस्वस्थ करून सोडणारा शेवट. लाल्याच्या रूपाने जगाला सज्जनपणाचे एक आशास्थान दाखवून नाटक संपते. परंतु प्रेक्षकांच्या मनात संघर्ष चालू राहतो. अनेक शंका, अनेक प्रश्न त्याची उत्तरे प्रेक्षक शोधत जातो. हसता हसता रडविणे व रडता रडता हसविणे हे आजच्या वास्तव नाटकाचे कार्य आहे. दुःखातील सुख व सुखातील दुःख जाणवणे व ते साकार करणे ही नाटककाराच्या विचार प्रवर्तकत्वाची खूण आहे. असे विचारप्रवर्तक नाटक ही आजच्या काळाची गरज आहे, लेखकाच्या वैचारिकतेची खूण आहे तसेच त्याच्या व्यक्तिदर्शन कौशल्याला आव्हान आणि वास्तवाला कल्पनेचे पंख देणारी बाब आहे. विसाव्या शतकात इंग्रजी नाट्यसृष्टीत नवेच तंत्र उदयाला आले. चौकटी बाहेरचे जग दाखवणारे वास्तववादी जीवन दर्शनाचे तंत्र इब्सेनचे तंत्र होते. इब्सेनने प्रेक्षकांना अस्वस्थ करणारी, हुरहुर लावणारी, विचार करायला व चिंतन करायला लावणारी नाटके लिहिली. त्यांचे विषय, व्यक्तिरेखा, शेवट, रचनापध्दती सारेच वेगळे होते. समीक्षणाची ठोकळेबाज पध्दतीही त्यांच्या समीक्षणाच्या दृष्टीने कुचकामी ठरते. सुखदुःखात्मक मानवी जीवनाचे यथार्थ चित्रण करणे हा उद्देश या नाटकांच्या कथांमागील आहे. मानवी जीवन अनंत आहे, अथांग आहे, त्याला शेवट नाही तसेच या नाटकांतील कथाही अंतहीन असतात. अश्रूंची झाली फुले या नाटकात एक अंक एक प्रवेश हे तंत्र त्यांनी स्वीकारले नाही. आवश्यकतेनुसार प्रवेशांची संख्या त्यांनी वाढविली आहे. आशयाच्या दृष्टीने अतिशय प्रभावी नाटक असे प्रस्तुतच्या नाटका बद्दल म्हणता येईल.

## नाटकातील समस्येची वैश्विकता :

प्रस्तुत नाटकात लेखकाने मांडलेली समस्या ही वैश्विक स्वरुपाची आहे. सत्–असत् प्रवृत्तीमधील संघर्ष हा पुराणकाळापासून चालत आलेला विषय आहे. पृथ्वीवर कोठेही अशा प्रवृत्तीची माणसे आढळतात. या प्रवृत्तीमधील संघर्ष हा प्रस्तुतच्या नाटकाचा विषय आहे. विद्यानंद व धर्माप्पा यांच्या निमित्ताने लेखकाने हा संघर्ष रंगविला आहे. विद्यानंद हा सत्प्रवृत्तीचा प्रतिनिधी आहे तर धर्माप्पा हा असत्प्रवृत्तीचा प्रतिनिधी आहे. याव्यतिरिक्त सत्प्रवृत्तीच्या इतरही अनेक व्यक्तिरेखा प्रस्तुत नाटकाचा नायक विद्यानंदाच्या नायकत्वाखाली, तर काही पात्रे ही असत् प्रवृत्तीची असून ती धर्माप्पाच्या प्रभावाखाली एकत्र येऊन हा लढा लढतात असे दाखविले आहे. कोणत्याही काळी, कोणत्याही देशामध्ये सुष्ट व दुष्ट, सज्जन व दुर्जन यांचा लढा सुरु असतोच. त्याचेच हे प्रतिनिधी आहेत. याचा अर्थ हा लढा दोन व्यक्तींपुरताच मर्यादित नाही हे दाखविण्यात कानेटकर यशस्वी झाले आहेत. एवढेच नाही तर विद्यानंदाची पत्नी सुमित्रा म्हणते त्याप्रमाणे देवदानवापासून हा लढा चालत आलेला आहे, हे सांगून ते त्या लढ्याला चिरंतन लढ्याचे स्वरुप देतात, हे या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. 'अश्रूंची झाली फुले' या नाटकात शिक्षण क्षेत्रातील वाढत्या भ्रष्टाचाराची समस्या मांडली आहे. ही एक आजची ज्वलंत अशी समस्या आहे. वाममार्गाने अफाट संपत्ती मिळविण्याचा हव्यास, त्यात मानवी मूल्यांचा होत असलेला चुराडा, बुध्दीजीवी वर्गाची ससेहोलपट, त्यांच्या व्यथा हा सारा भाग या नाटकामध्ये संघर्षाचे रूप घेऊन



330

२४६

Scanned with CamScanner

येतो. समकालीन समस्या असल्यामुळे वाचक वा प्रेक्षक तिच्याकडे ओढला जातो. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आज भ्रष्टाचार फैलावत आहे. शिक्षणाचे क्षेत्र तरी त्यापासून अलिप्त असावे असे प्रत्येक सुजाण नागरिकाला वाटत असते. त्यामुळे या क्षेत्रातील भ्रष्टाचार ही कोणालाही दुःखद वाटणारी गोष्ट आहे.

**प्रभावी व्यक्तिचित्रणे :**

कानेटकरांच्या प्रस्तुत नाटकातील व्यक्तिरेखा हया सजीव असून आपल्याभोवती वावरणाऱ्या आहेत असे वाचक प्रेक्षकाला वाटते. कानेटकरांच्या व्यक्तीदर्शन कौशल्याचे हे एक महत्वाचे अंगच म्हणावे लागेल. पात्रांच्या मनातील भावभावना, त्यांची आंदोलने अतिशय हळूवारपणे आणि तितकीच प्रभावीपणे व्यक्त झाली आहेत. जीवनातील कोणत्यातरी मूल्यासाठीच जगणारी – मरणारी माणसे समर्थपणे उभी करुन त्या मूल्यांची पुजा प्रेक्षकांच्या भावपुष्पांनी करवणे हे अत्यंत अवघड वाटणारे कार्यही कानेटकर व्यक्तिदर्शन सामर्थ्याच्या बळावर सहज करतात. विद्यानंदाच्या आयुष्यातील टप्पे, त्याचा संघर्ष, भावभावना कानेटकर प्रभावीपणे मांडतात. सुमित्रेचे व्यक्तिमत्वही विलोभनीयरीत्या साकार झाले आहे. नायक नैराश्यग्रस्त झालेला असताना त्याला सावरणारी समर्थ स्त्री ते साकार करतात. स्त्रीत्वाचे सर्व कोमल गुण दाखवून व त्याचबरोबर आपल्या अलौकिक सामर्थ्याच्या सात्विक तेजाने नायकाचेही जीवन तिने उजळले आहे. सुमित्रेच्या चित्रणाने नाटकाला एक उठाव आला आहे. लाल्या उर्फ चुनीलाल हा विद्यानंदाने दाखविलेल्या रस्तावरुन चालतो. उच्च नीतीमूल्यांची पाठराखण करतो. धर्माप्पा हा खलप्रवृत्तीची व्यक्तिरेखा नायकाच्या आयुष्यात वादळ आणते. आपल्या भ्रष्ट वागणुकीने अनेक कारनामे करते. नाटकामध्ये मोजक्याच व्यक्तिरेखा असून त्यामुळे नाटकाची कथावस्तू साकार होण्यास मदत झाली आहे.

**संवादकौशल्य :**

नाटककाराला नाटकाचे संविधानक संवादाच्या व्दारे सांगायचे असते. त्यादृष्टीने संवाद हे वास्तव संभाषणाच्या स्वरुपाचे लिहिणे हे नाटककाराचे महत्वाचे कौशल्य असते. प्रस्तुत नाटकातील संवाद हे छोटे प्रसंगानुकूल आणि भावनानुकूल आहेत. तसेच पात्रांचा स्वभाव आणि त्यांच्या एकंदर व्यक्तिरेखेला साजेसे आहेत. मोठमोठी व्याख्यान वजा भाषणे किंवा अलंकारप्रचुर वाक्ये कानेटकर घालीत नाहीत. सुटसुटीतपणा, मितव्ययाचे तत्व त्यांच्या नाटकात आढळते. भाषेचे संयत स्वरुप त्यांचे भाषाप्रभुत्व दाखवते. मार्मिक शब्दयोजना हे एक त्यांच्या संवादाचे वैशिष्टय आहे. उदा. नाटकाच्या अखेरच्या प्रसंगातील पुढील संवाद–

*"विद्यानंद: थांब वेड्या, हे अश्रू पुसू नकोस. वाहू दे त. या अश्रूंतच उद्याच्या जगाची आशा आहे. या माझ्या अश्रूंची, आणि तुझ्या......... (सुमित्रेला) आणि तुझ्याही अश्रूंचीआज फुलं झाली आहेत. ऊठ. मला घेऊन जाण्याची आज्ञा दे.*

*सब–इन्स्पेक्टर : (पुढे होत) चला माझ्याबरोबर.......*

*विद्यानंद : (क्षणभर थबकून सुमित्रेकडे पाहत) सुमित्रा– (गहिवरुन)*

*सुमित्रा : (ताडकन उठत डोळे पुसत त्याचे हात धरीत स्मित करीत) मी वाट पाहीन. लवकर लवकर आपल्या घरी या. आपल्याला अजून पुष्कळ पुष्कळ दुःख भोगायची आहेत, होय ना?*

*विद्यानंद : (अश्रू आवरीत) इन्स्पेक्टर, मी तयार आहे. चला."*

*नाटकातील हा संवाद साध्या शब्दांनी, सुटसुटीतपणाने बांधलेला आहे. त्याचप्रमाणे पात्रांचा स्वभाव त्यातून कळतो. प्रसंगानुरुप योग्य भावना वाचक प्रेक्षकांच्या मनात जागृत होतात. अशा संवादाची पखरण नाटकभर जाणवते.*

प्रा. डॉ. संविता माधवराव पवार 



247

Scanned with CamScanner

नाटकातील प्रसंग :

प्रस्तुत नाटकात कौटुंबिक प्रसंग अत्यंत जिव्हाळ्याने वर्णन केले आहेत. मराठी माणसाचे मानसशास्त्र लक्षात घेऊन कानेटकर पतीपत्नी, दीरभावजय, मित्र, पितापुत्र यांच्या प्रेमाची चित्रणे, हळूवार भावना दर्शविणारे प्रसंग, त्यांच्या आठवणी, संयत शृंगार, खुसखुशीत विनोद याचे चित्रण असे करतात की गंभीर प्रकृतीची नाटकेही रूक्ष होत नाहीत. उदा. पहिल्या अंकातील प्रवेश ज्यामध्ये शंभूमहादेव आणि नीलम विद्यानंदाच्या घरी आले आहेत.

*"सुमित्रा : तुमचा 'बिझिनेस' ना? त्यात हिला नका गुंतवू. बये, माझं ऐकशील तर घर संभाळ आणि या महाशयांना थोडं तरी ताळ्यावर आण. आम्ही दोघांनी हात टेकलेत त्यांच्यापुढं.*

*शंभूमहादेव : छा SS न! चांगल! म्हणजे हिला वळण लावण्यासाठी मी तुमच्या घरी ठेवणार होतो, तर तुम्ही मलाच ताळ्यावर आणण्यासाठी हिला नेमलीत? आता ही कसली माझ्या धाकात राहणार?*

*सुमित्रा : शंभूमहादेव, लग्न झालेल्या बाईला कोणी दुसऱ्यांनी , नाही वळण लावावं लागत. संसाराचा पाशच तिला वळणात ठेवतो. धाकात ठेवावं लागतं तुमच्यासारख्या पुरुषांना.*

*निलम : नीट ऐकून ठेवा बरं का हे !*

*शंभूमहादेव : (चिडावून) बरं–बरं फुशारुन जाऊ नकोस. वहिनींनाअजुन तुझं सगळं कुठं ठाऊक आहे ?*

*निलम : मग सांग की SS ! माझं सगळं सांगा आणि तुमचंही सगळं कळू द्या."[४]*

नाटक म्हटल्यानंतर कथानकामध्ये नाट्य निर्माण करता यायला पाहिजे. 'अश्रूंची झाली फुले' या नाटकामध्ये असे नाट्यमय प्रसंग आलेले आहेत की ज्यामुळे कथानकाला अचानक कलाटणी मिळते. उदा. पहिल्या अंकामध्ये लाल्यावरून विद्यानंद आणि धर्माप्पा यांच्यामध्ये उभा राहिलेला संघर्ष, दुसऱ्या अंकामध्ये विद्यानंद आणि सुमित्रा यांच्यामध्ये प्रेमसंवाद चालू असताना अचानक पोलिस येतात आणि विद्यानंदाला अटक करून घेऊन जातात. तिसऱ्या अंकामध्ये इन्स्पेक्टर झालेला लाल्या अचानक विमानतळावर प्रवेशतो आणि विद्यानंदाला अटक होते. या सर्व प्रसंगांमध्ये जबरदस्त नाट्य आहे. वाचक प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याचे काम अशा प्रसंगांव्दारे घडते.

## नाटकाचा वैशिष्ट्यपूर्ण शेवट :

कानेटकरांच्या प्रत्येक नाटकाची अखेर अतिशय सुंदर व रेखीव असते. कायम लक्षात रहावा असा प्रत्येक नाटकाचा शेवट वैशिष्ट्यपूर्ण असतो. प्रसंगाला कलाटणी देणारा, सुखद धक्का देणारा, नवे आशास्थान दाखविणारा असतो. प्रस्तुत नाटकाचा शेवटही एकदम कलाटणी देणारा, अनपेक्षित असला तरी संभवनीय आणि भावनेच्या दृष्टीकोनातून पात्रांसोबतच प्रेक्षकांच्याही भावनाशीलतेचा उच्चबिंदू गाठणारा आहे. एका डोळ्यात हसू व दुसऱ्या डोळ्यात अश्रू घेऊनच प्रेक्षक घरी जातो किंवा वाचक वाचन थांबवतो. भावनिकदृष्ट्या उच्चांक गाठणारा नाटकाचा शेवट आहे. वास्तव परिस्थिती कितीही भयानक, नैराश्य निर्मिणारी असली तरी आशेचा प्रकाश देणारा तारा कानेटकर दाखवतात. शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टाचाराला शाम बळी पडतो व विद्यानंदासारख्याची जीवनावरील श्रध्दा नाहिशी होते परंतु



Scanned with CamScanner

PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 2, ISSUE 2

लाल्यासारखा पूर्वीचा गुंड मुलगा, सज्जनाच्या प्रेमळ मार्गदर्शनाने सत्प्रवृत्तीचा दीप तेवत ठेवतो व कोणत्याही प्रलोभनाच्या झंझावाताने तो दीप विझू देत नाही, हे एक मोठे आशास्थान त्यांनी दाखविले आहे. नाटककाराची मानवतेवरील, जीवनावरील श्रध्दाच यातून व्यक्त होते. सात्विकतेच्या सुगंधाने वातावरण दरवळत ठेवून कानेटकर नाटकाची अखेर करतात हे या नाटकाचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

**समारोप :**

'अश्रूंची झाली फुले' या नाटकात शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या निमित्ताने सत् आणि असत् प्रवृत्तीचा संघर्ष दाखविला आहे. परंतु तो संघर्ष प्रत्यक्षात घडताना दिसत नाही. विद्यानंदावर भ्रष्टाचाराचा आरोप होतो. त्याला तुरुंगवास होतो परंतु या धक्क्याने जीवनावरील त्याची श्रध्दाच नष्ट झालेली दिसते. जीवनावर प्रचंड श्रध्दा असलेला, सत्प्रवृत्तीने वागणारा विद्यानंद हा शिक्षा भोगून झाल्यानंतर शंभूमहादेवाच्या गोटात सामील होऊन सोनेरी टोळीचा नायक बनतो, ही बाब खटकत राहते. नाटकामध्ये कथानकाला अनुसरुन नाट्यमय प्रसंग आलेले आहेत. वाचक प्रेक्षकांच्या मनातील उत्कंठा वाढविण्याचे काम नाटक करते. पात्रांची संख्या ही मोजकीच आहे. संवाद आटोपशीर, सुटसुटीत आणि भावनांना आव्हान करणारे आहेत. नाटकाची अखेर ही नाट्यमय आणि उत्कंठावर्धक आहे. प्रस्तुत नाटकाद्वारे लेखकाची जीवनावरील, मानवतेवरील श्रध्दाच व्यक्त होते.

## संदर्भ टिपा

1) वसंत कानेटकर, अश्रूंची झाली फुले, मुंबई, पाचवे पुनर्मुद्रण 2014, पृ.क. 108

2) तत्रैव, पृ.क. 7

Smt. Sindhutai Jadhav Maha. Mehkar 330

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana



Scanned with CamScanner